संक्षिप्त फौ. ख. क्र. २१८/२०२३
सरकार -वि.- संजय
नि.क्र. १३ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - किसन सोमाजी बोरकर,
वय ५५ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – पांजरेपार, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. दिनांक १८.०३.२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याला येण्याकरिता बोलाविले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष कुठलीही कारवाई केली नव्हती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर मला माहित नाही.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.०३.२०२३ रोजी पोलीसांनी मला मौजा पांजरेपार हनुमान मंदिराजवळ ता. भिवापूर येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष अपघातग्रस्त घटनास्थळाचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. मी

रोहीत माथनीकरला ओळखत नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

३.      नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - २६.०६.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.